# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे. -४११ ००१.

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

Website : http//:barti.maharashtra.gov.in


## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा परीक्षा-२०२३-२४ या प्रशिक्षणासाठी पुणे व नाशिक येथे नि:शुल्क, अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) साठी अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा परीक्षेसाठी नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) खाजगी प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र युवक-युवतींनी https://register.bartieducare.in/student/register लिंकवरून अर्ज ऑनलाईन सादर करावा.

पुणे व नाशिक या ठिकाणी प्रशिक्षण संस्थामार्फत अनुक्रमे पुणे करीता २०० व नाशिक करीता २०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. त्यामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी, ४ टक्के जागा "दिव्यांग" असलेल्या व्यक्तींसाठी (Person With Disability), ५% जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील ( वाल्मिकी व तत्सम जाती-होलार,बेरड,मातंग,मांग,मादगी, ई.) विद्यार्थ्यांकरिता आरक्षित असतील, एकूण जागांच्या ५% जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात येईल.

**पात्रता :-**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
३) उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
४) उमेदवाराचे वय महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवेच्या अटी व शर्ती नुसार असावे.
५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२३-२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांस बसणेसाठी पात्र असावा.
६) रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असतील.

**विद्यार्थी निवडीचे निकष:-**

- प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने गुणवत्ता यादीतील रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या सर्व पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**परीक्षेचे स्वरूप**

- महाराष्ट्र लोकसेवा आयोग- राज्यसेवा परीक्षेच्या धर्तीवर असेल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :-**

१) अर्ज दाखल करण्याची **शेवटची तारीख १०/०७/२०२३**
२) **प्रशिक्षण कालावधी १२ महिन्यांचा राहील.**
३) पात्र उमेदवारांची चाळणी परीक्षा **दि. ३०/०७/२०२३** रोजी घेण्यात येईल. उमेदवारांची गुणानुक्रमे प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल.
४) निवड झालेल्यापैकी पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान रोज ४ तास व त्यापेक्षा जास्त कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येईल.तसेच एकूण दरमहा ८० टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहील त्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ९०००/- विद्यावेतन देण्यात येईल.
५) विद्यार्थ्यांना टेस्ट सिरीज (ऑनलाईन/ऑफलाईन) व विशेष शैक्षणिक साहित्य व पुस्तके यासाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु.२५०००/- विद्यार्थ्यांना देण्यात येईल.
६) प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
७) ज्या उमेदवरांनी यापूर्वी बार्टी, पुणे मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण यापूर्वी घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.
८) सदर योजनेबाबत/प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा.महासंचालक,बार्टी तसेच शासनास राहतील.

**Adv/ /२०२३/**

**(सुनिल वारे)**
**महासंचालक, बार्टी, पुणे.**